SAMPARK Public Relations

# गो-एअरच्या ताफ्यात वाढ

**मुंबई :** वाडीया उद्योगसमूहाच्या मालकीच्या गो-एअर प्रवासी वाहतूक सेवेने आपल्या ताफ्यात वाढ करताना एअर-बस ३२० हे अद्यावत विमान खरेदी केले आहे. नवीन विमाने आणि इतर विमान सेवा मार्ग चोखंदळण्याचा गो-एअर नेहमीच प्रयत्न करीत असते. गो-एअरच्या ताफ्यातील हे ९ वे विमान असून नोव्हेंबरमध्ये १० वे विमान दाखल होणार आहे. सध्या गो-एअरची प्रती आठवडे ७३० विमाने उड्डाणे होतात त्यात वाढ करून ८९० पर्यंत नेण्याचा कंपनीचा मानस असल्याचे कंपनीचे कार्यकारी अधिकारी कौशिक कोहना यांनी सांगितले.